# महत्त्वाचे

## शनि अमावस्येनिमित्त पुणतांबा येथे भाविकांची गर्दी



**पुणतांबा (वार्ताहर)**– श्रीक्षेत्र पुणतांबा येथे शनि अमावस्येनिमित्त भाविकांनी शनिवारी सकाळपासूनच शनि मंदिर व योगीराज चांगदेव महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी रांगा लावल्या होत्या. पुणतांबा येथील बाजारतळाच्या पश्चिम बाजूला गोदावरी नदीच्या काठावर प्राचीन काळातील शनि मंदिर आहे. तसेच चांगदेवनगर येथे मारूती मंदिराच्या बाजूलाही शनि मंदिर आहे. दोन्ही मंदिरात शनि मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी व अभिषेक करण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. मंदिरासमोर शनिदेवाच्या मूर्तीला तेल तसेच इतर वस्तू वाहण्यासाठी दुकाने थाटण्यात आली होती. तसेच भाविकांसाठी खिचडी व फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. शनि मंदिरात दर्शन घेतल्यानंतर अनेक भाविकांनी चांगदेव महाराज मंदिर परिसरात जाऊन योगीराज चांगदेव महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेतले. परिसरातील महादेव मंदिर, दत्त मंदिर, काशी विश्वेश्वर मंदिर तसेच मुक्ताई ज्ञानपीठात जाऊन दर्शन घेतले. सध्या गोदावरी नदी दुथडी भरून वाहत असल्यामुळे भाविकांनी गंगास्नानाचा लाभ घेतला. सायंकाळपर्यंत भक्तांचा ओघ सुरू होता, अशी माहिती योगीराज चांगदेव महाराज देवस्थानचे विश्वस्त महेश मुरुदगण यांनी दिली.

## नगरपालिका शाळा क्रमांक ३ मध्ये स्वातंत्र्यदिन साजरा



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– येथील गोंधवणी परिसरातील नगरपालिका शाळा क्रमांक तीन मध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. माजी आमदार भाऊसाहेब कांबळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी संगीतमय कवायत, संचलन तसेच परेड सादर केले. माजी आमदार भाऊसाहेब कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी माजी नगरसेविका जयश्री शेळके, मनसे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, विजय शेळके, माजी मुख्याध्यापक नवनाथ अकोलकर, मारुती शिंदे, किशोर शिंदे, ग्रामपंचायत सदस्या श्रीमती.काळे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सरला खंडागळे, उपाध्यक्ष संगीता देवकर, संध्या दुशिंग यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, भैरवनाथ प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. नवभारत साक्षरता अभियानांतर्गत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका स्मिता गायकवाड, राजेंद्र गायकवाड, प्राची लोळगे, सचिन डोखे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन राजेंद्र गायकवाड यांनी केले तर आभार सचिन डोखे यांनी मानले.

## दुर्गापूर येथील दहावीचे माजी विद्यार्थी २७ वर्षानंतर पुन्हा एकत्र



**राहाता (प्रतिनिधी)**– सहकारातून समृद्धीकडे या माध्यमातून आपण पुढे गेलो, इतरांनाही आपण आपल्या सहकार्यातून पुढे नेऊया, हा संकल्प प्रवरा माध्यमिक विद्यालय दुर्गापूर येथील १९९८ च्या इयत्ता दहावीच्या मित्र परिवाराने केला.

२७ वर्षांनंतर एकत्र मुलांनी गावासाठी तसेच गावातील आपल्या विद्यार्थ्यांसाठी कार्यरत राहण्याचा संकल्प स्नेह मेळाव्याच्या माध्यमातून व्यक्त केला. प्रवरा परिसर म्हणजे सहकाराच्या माध्यमातून संपूर्ण जगाला एकमेकांना सहाय्य करण्याचा संदेश देणारी भूमी आहे. याच माध्यमातून पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे विचार पुढे नेत, आपणही या समाजाचे काहीतरी देणे लागतो. या भावनेतून प्रवरा माध्यमिक विद्यालय दुर्गापुर येथील १९९८ मध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलांनी एकत्र येत स्नेह मेळावा आयोजित केला. स्नेह मेळावा कृषिभूषण अ‍ॅग्रो टुरिझम, चंद्रापुर येथे झाला.

या मेळाव्याच्या माध्यमातून भविष्यासाठी येणाऱ्या अडचणी तसेच आपल्याबरोबरच इतरही मुलांना पुढे जाताना योग्य प्रकारे संस्कार व्हावा, त्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून त्यांनी स्नेह मेळाव्यामध्ये एक आराखडा तयार केला आणि या आराखड्यानुसार त्यांनी आपले कामही सुरू केले आहे. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनातून प्रवरा शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी जागतिक पातळीवर पोहोचावा आणि यासाठी डॉ. विखे पाटील या नेहमीच प्रयत्नशील असतात. ग्रामीण विद्यार्थी हा नोकरी बरोबरच स्वयंरोजगार निर्माण करणारा व्हावा त्यांनी समाजासाठी कार्य करावे हाच उद्देश या मेळाव्याच्या माध्यमातून पुढे घेऊन जाण्याचा संकल्प ही यावेळी करण्यात आला. वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेली चाळीस माजी विद्यार्थी सहभागी झाले. आय टी, औषध निर्माण, मेकॅनिकल, कृषि, विधी, स्थापत्य, शिक्षण, विमा, राजकीय, विपणन, प्रगतशील शेतकरी इत्यादीचा सहभाग होता.

# सार्वमतमुळे जिल्ह्यात समता परिषदेचे मजबूत संघटन

आपला सार्वमत

सार्वमत हे अहिल्यानगर जिल्ह्याचे खरे मुखपत्र ठरले आहे. सार्वमतमध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमीची वाचकांमध्येच नव्हे तर शासकीय पातळीवरही दखल घेतली जात असल्याने सार्वमतचा वेगळा दबदबा आहे. अखिल भारतीय समता परिषदेच्या माध्यमातून वेळोवेळी केलेल्या समाजकार्याची दखल सार्वमतने नेहमीच घेतल्याने समता परिषदेचे संघटन जिल्ह्यात मजबूत झाले असल्याची वास्तविकता आहे.

अखिल भारतीय समता परिषदेच्या सामाजिक कार्यात मी प्रारंभापासून सहभागी आहे. समता परिषदेच्या स्थापनेपासून राहाता तालुक्याचा सहसचिव म्हणून कार्य सुरू केले होते. त्यावेळी छोट्या-छोट्या सामाजिक कामांच्या, आंदोलनाच्या बातम्या सार्वमतने वेळोवेळी प्रसिद्ध करून आमची काम करण्याची मानसिकता वाढवल्यामुळे समता परिषदेचे काम जोमाने करता आले. सार्वमतच्या माध्यमातून कामे झाल्याने समाजाला न्याय मिळत गेला आहे. त्यामुळे जिल्ह्यात अखिल भारतीय समता परिषदेचा विस्तार होण्यासही दैनिक सार्वमतने मोठा हातभार लावला आहे, हे नाकारून चालणार नाही.



**संजय इनामके (लोहगाव)**
सरचिटणीस, समता परिषद
राहाता तालुका
मो. ९५६१२७४६२७

सन २०२२ पासून समता परिषदेचा राहाता तालुका सरचिटणीस म्हणून मी कार्यरत आहे. दैनिक सार्वमतने उभारी दिल्यामुळे माझ्याकडून अधिक जोमाने परिषदेचे कार्य सुरु आहे. आजही सार्वमत माझे प्रथम पसंतीचे दैनिक राहिले आहे. सार्वमत परिवाराने नेहमीच आमच्या समस्यांना धारदार लेखणीतून वाचा फोडण्यासाठी सहकार्य केले आहे. सामाजिक कार्याची खरी आवड निर्माण झाली ती सार्वमतमुळेच. असे आमच्या सारख्या असंख्य तरुणांना घडवणारे लोकप्रिय दैनिक सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे, याचा आम्हाला वाचकांना मनस्वी आनंद होत आहे. हाच दर्जा यापुढील काळातही सुरू राहून सार्वमतचा शतक महोत्सव साजरा व्हावा, याच या सुवर्णमहोत्सवानिमित्त शुभेच्छा!

### वाचकहो, आपणही व्यक्त व्हा!

वाचकप्रिय ‘सार्वमत’ने यंदा सुवर्णमहोत्सवी वर्ष गाठले. या वाटचालीत वाचक म्हणून आपला वाटा अनन्यसाधारण आहे. आपण ‘सार्वमत’च्या वाटचालीला यशाचा आकार दिला. आपल्या अवतीभवतीच्या घटनांचा वेध घेत मार्गक्रमण करत असताना वाचक म्हणून आपल्याही मनात ‘सार्वमत’विषयी अनेक आठवणी असणार. अशाच हृदय आठवणी व्यक्त करता याव्यात यासाठीच ‘आपला सार्वमत’ हे सदर सुरू आहे. आपल्या आठवणीतील बातमी, आपल्या प्रश्नाला ‘सार्वमत’ने दिलेला प्रतिसाद, प्रश्न आणि त्यांची सोडवणूक, ‘सार्वमत’मधून उमटलेल्या एखादी घटना-घडामोडीने आपल्यावर टाकलेला प्रभाव, अशा अनेक अंगाने आपल्या आठवणी २५० ते ३०० शब्दात येथे मांडता येतील. आपले लेखन पासपोर्ट छायाचित्रासह दैनिक सार्वमतच्या नजिकच्या कार्यालयात अथवा आपल्या गावातील वार्ताहर/प्रतिनिधीकडे पाठवावे. निवडक लेखन आपला ‘सार्वमत’मधून प्रसिध्द होईल.

– संपादक

## शिरसगावची ग्रामसभा खेळीमेळीत



**शिरसगाव (वार्ताहर)**– श्रीरामपूर तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाची समजली जाणारी व ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व गणेश मुदगुले यांच्या नेतृत्वाखाली वाटचाल करीत असलेल्या ग्रामपंचायत शिरसगावची ग्रामसभा खेळीमेळीत पार पडली.

यावेळी सरपंच राणी वाघमारे, उपसरपंच संजय यादव, तलाठी श्री.घोरपडे, पंचायत समितीचे श्री.ठाकरे, शाळेच्या मुख्याध्यापिका, अंगणवाडी सेविका, अशोक पवार, सुभाष गवारे, शांताराम गवारे, सुरेश ताके, दिनकर यादव, निलेश यादव, बाळासाहेब गवारे, सतीश गवारे, संदीप वाघमारे, गीताराम जाधव, सीताराम धनाड, भाऊसाहेब बिलवरे, शिवाजी गवारे, ललित गायकवाड, हिरामण माळी, युसुफ शेख, नारायण मोरे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य ग्रामस्थ उपस्थित होते.

नागरिकांच्या समस्यांबाबत माजी सरपंच आबासाहेब गवारे, राजेंद्र गवारे, रोहित यादव, महेश ताके इत्यादींनी चर्चेत भाग घेतला व सूचना मांडल्या. यावेळी जलजीवन पाणी पुरवठा, गाव बालविवाह मुक्त करण्याचा संकल्प, वृक्ष लागवड, टीबीमुक्त गाव करणे इत्यादी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

## शिरसगावची ग्रामसभा बेकायदेशीर- गवारे

**श्रीरामपूर (वार्ताहर)**– तालुक्यातील शिरसगाव येथे गुरूवार दि.२१ ऑगस्ट रोजी पार पडलेली ग्रामसभा बेकायदेशीर असून ती सभा रद्द करून सरपंचाच्या अध्यक्षतेखाली नवीन ग्रामसभा घेण्यात यावी, अशी मागणी माजी उपसरपंच राजेंद्र गजानन गवारे, आबासाहेब बाबासाहेब गवारे, सोसायटीचे चेअरमन किशोर गंगाधर पाटील, व माजी सरपंच सतिष ज्ञानदेव गवारे यांनी केली आहे.

याबाबत प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात त्यांनी म्हंटले आहे की, शिरसगाव येथे गुरूवार दि.२१ ऑगस्ट रोजी ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. येथे सरपंचपद महिला राखीव असून सरपंचांना माहीत नसलेल्या कारभाराबद्दल उत्तरे देता येणार नाही. म्हणून सरपंचांनी ग्रामसभेच्या अध्यक्षाची निवड केली. मुळातच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५५ कलम ७(३) आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ अन्वये ५४(३) नुसार, जर कोणी म्हणत असेल की सरपंच कोणालाही ग्रामसभेचा अध्यक्ष बनवू शकतो, तर ते कायद्याला धरून नाही. ग्रामसभेचे अध्यक्षपद गणेश मुदगुले यांना देण्यात आले. मात्र, ग्रामस्थांनी विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत. ग्रामपंचायतचा कारभार सरपंच कमी आणि अध्यक्ष अधिक चालवला असल्यामुळे सरपंचाला त्याची काहीही माहिती नाही.

ग्रामसभेमध्ये पाण्याच्या प्रश्नावर, दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत झालेली कामे, गावातील प्रस्थापित लोकांच्या घरांचे फेर सर्वेक्षण, वृक्षारोप, डसबीन खरेदी ही सर्व कामे एकाच व्यक्तीला देण्यात येतात, त्या व्यक्तीची कामे निकृष्ट दर्जाचे असून त्याच व्यक्तीला कामे का दिली जातात. असा सवाल त्यांनी केला आहे.

दि.२१ ऑगस्ट रोजी झालेली ग्रामसभा पूर्णपणे बेकायदेशीर होती. त्या ग्रामसभेची तक्रार बी.डी.ओ. श्रीरामपूर यांच्याकडे तसेच सीईओ जिल्हा परिषद अहिल्यानगर व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे. जी बेकायदेशीर ग्रामसभा झाली, ती रद्द करून सरपंचाच्या अध्यक्षतेखाली नवीन ग्रामसभा घेण्यात यावी, अशी मागणी या पत्रकात करण्यात आली आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज संगमनेरात

### आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाषणाकडे लागले लक्ष



**संगमनेर (तालुका प्रतिनिधी)**– विधानसभा निवडणुकीत अमोल खताळ यांच्या रुपाने महायुतीचे आमदार झाले. यानंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जनतेने दिलेल्या आशीर्वादाबद्दल आभार मानण्यासाठी रविवारी (दि.२४) संगमनेरात येणार आहे. यानिमित्ताने आयोजित जाहीर सभेत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते कोणते राजकीय भाष्य करतात याची उत्सुकता लागली आहे.

शहरातील जाणता राजा मैदानावर संपन्न होणाऱ्या महामेळाव्याची जय्यत तयारी आमदार खताळ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला असून, मंडप उभारण्यात आला असून जिल्ह्यासह राज्यातील शिवसेनेचे आणि महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते या महामेळाव्यास उपस्थित राहून संबोधित करणार आहेत. यावेळी पर्यटन मंत्री आणि जिल्ह्याचे संपर्क मंत्री शंभूराजे देसाई, जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार विठ्ठल लंघे, शिवसेनेचे संपर्क प्रमुख भाऊ चौधरी, बाळासाहेब पवार, शिवसेना नेत्या ज्योती वाघमारे, राजू वाघमारे, शिवसेनेच्या अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख अक्षय महाराज भोसले यांसह महायुतीमधील सर्व माजी आमदार, खासदार, घटक पक्षांचे जिल्हाध्यक्ष, तालुकाप्रमुख, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. रविवारी दुपारी चार वाजता उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यासह मान्यवरांचे आगमन संगमनेर महाविद्यालयाच्या हेलिपॅडवर आगमन होणार आहे. पुणे-नाशिक महामार्गावर त्यांच्या स्वागताची तयारी करण्यात आली आहे. त्यानंतर आमदार खताळ यांच्या महायुती जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. यानंतर जाणता राजा मैदानावरील सभास्थळी नागरी सत्कार महायुतीच्यावतीने करण्यात येणार आहे. या सभेत ते काय बोलणार याची उत्सुकता लागली आहे.

## पद्मश्री राहीबाई पोपेरेंनी साजरा केला बैलपोळा



**अकोले (प्रतिनिधी)**– तालुक्यातील कोंभाळणे येथील पद्मश्री बीजमाता राहीबाई पोपेरे यांना पाळीव प्राण्यांविषयी नितांत प्रेम आणि आस्था आहे. त्यांनी आपल्या गोठ्यातील लाडक्या बैलजोडीसह उत्साहात बैलपोळा सण साजरा केला.

आदिवासी भागातील बहुसंख्य शेती छोट्या छोट्या खाचरांमध्ये विखुरलेली असल्याने या भागामध्ये बैलजोडी शिवाय शेती करणे अशक्य असते. यांत्रिकीकरणामुळे गावोगावी बैलपोळा सण नावालाच साजरा होत आहे. बैलांची जागा ट्रॅक्टरने घेतल्याने बहुसंख्य गावातून बैलजोड्या हद्दपार झाल्या आहेत. अशाही परिस्थितीत आदिवासी भागात शेतकरी आपल्या शेतीची मशागत करण्यासाठी डांगी प्रजातीच्या दर्जेदार बैलजोड्यांचे संगोपन करत असतो. पद्मश्री राहीबाई व त्यांचे कुटुंब सुद्धा डौलदार बैलजोडीचे संगोपन करत आहे. बैलपोळा सणानिमित्त बैलांची विशेष काळजी घेत त्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी लाडक्या बैलजोडीला सुंदर पद्धतीने सजवले होते. पारंपरिक पद्धतीचे साज बैलजोडीवर चढवून त्यांना सजवण्यात आले होते. पाठीवर सुंदर झूल टाकून आपल्या लाडक्या सर्जाराजाची मिरवणूक त्यांनी गावातून काढली होती. पद्मश्री राहीबाई यांनी स्वतःच्या हाताने बैलजोडीसाठी पुरणपोळीचा नैवेद्य तयार केला होता. गावभर मिरवणूक काढल्यानंतर नैवेद्य दाखवून बैलजोडीची पूजा त्यांनी आपल्या कुटुंबियांसहित केली. मुक्या प्राण्यांची विशेष आवड असलेल्या राहीबाई यांनी गेल्या ४० वर्षांपासून आपल्या गोठ्यामध्ये बैलजोडीचा सांभाळ केलेला आहे. यापूर्वी त्यांनी ऊस तोडणीचे काम केले असल्याने बैलजोडीनेच त्यांनी तोडलेल्या उसाची वाहतूक केलेली आहे. डांगी प्रजातीचे बैल जास्त पर्जन्यमान असलेल्या भागासाठी व भात खासरात उतरून काम करण्यासाठी प्रसिद्ध आहेत. आदिवासी भागाचे वैभव असलेल्या डांगी प्रजातीच्या बैलांचे संगोपन करण्याचे विशेष आवाहन त्यांनी पोळ्यानिमित्त शेतकरी बांधवांना केले आहे.

## कोंढवड येथे बिबट्याच्या हल्ल्यात शेळी ठार

**कोंढवड (वार्ताहर)**– राहुरी तालुक्यातील कोंढवड येथे बिबट्याने केलेल्या हल्ल्यात एक शेळी ठार झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले असून या बिबट्याला तात्काळ जेरबंद करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



शुक्रवार दि. २२ ऑगष्ट रोजी मध्यरात्रीच्या सुमारास कोंढवड येथील मच्छिंद्र श्रावण म्हसे या शेतकऱ्याच्या गायगोठ्यात बांधलेल्या शेळ्यांवर बिबट्याने हल्ला केला. गाया व शेळ्यांचा घोंगाट ऐकून म्हसे हे घरातून बाहेर आले असता त्यांना बिबट्या शेळीच्या मानेला धरून ओढत नेत असताना दिसला. म्हसे यांनी आराडाओरड केल्याने बिबट्याने शेळीला सोडून तेथून शेजारी असलेल्या गिन्नी गवताच्या शेतात धूम ठोकली. मात्र, या हल्ल्यात शेळी मृत झाली. या घटनेची माहिती वनविभागाला कळवल्यानंतर वनविभागाचे कर्मचारी गोरक्षनाथ मोरे यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. गेल्या वर्षभरापासून राहुरी तालुक्यातील पूर्व भागात बिबट्याचा धुमाकूळ सुरूच असून बिबट्यांनी आतापर्यंत अनेक शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांवर हल्ले करून ते फस्त केले आहे. तसेच या परिसरात काही वाटसरूंवर ही बिबट्यांनी हल्ले करण्याच्या घटना घडल्या आहेत. मध्यंतरी काही दिवस बिबट्याचे हल्ले व दर्शन होत नसल्याने शेतकऱ्यांची काही प्रमाणात भिती कमी झाली होती. मात्र, आता पुन्हा बिबट्याचे दर्शन व हल्ले होत असल्याने परिसरात दहशत निर्माण झाली आहे. तरी वनविभागाने या भागात तात्काळ पिंजरे लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांनी केली आहे.

## भाजपा अनुसूचित जाती मोर्चा सचिवपदी किशोर गायकवाड



**जेऊरकुंभारी (वार्ताहर)**– कोपरगाव तालुक्यातील भाजपा अनुसूचित जाती मोर्चा सचिवपदी जेऊरकुंभारी येथील युवा कार्यकर्ते किशोर गायकवाड यांची निवड करण्यात आली.

नियुक्तीपत्र संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली स्नेहलता कोल्हे व युवानेते विवेक कोल्हे यांच्या हस्ते देण्यात आले. विवेक कोल्हे यांचे कट्टर समर्थक अशी गायकवाड यांची ओळख आहे. स्नेहलता कोल्हे यांच्या संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून गोरगरीब व मागासवर्गीय समाजासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. आपल्याला मिळालेल्या पदाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना त्या योजनांचा अधिक लाभ कसा घेता येईल, याबाबत प्रयत्न करणार असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

## पित्याने केला मुलीचा विनयभंग; पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल

**राहुरी (प्रतिनिधी)**– जन्मदात्या बापाने आपल्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना घडली असून राहुरी पोलीस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेतील अल्पवयीन मुलगी तिच्या आई-वडिलांसोबत राहुरी तालुक्यातील एका गावात राहत आहे. तिच्या वडिलांना दारू पिण्याचे व्यसन असून, तो मुलीला आणि पत्नीला कायम मारहाण करत असतो. काही दिवसांपूर्वी त्या मुलीची आई सायंकाळच्या सुमारास घरात नसताना तिच्या वडिलांनी तिला त्यांच्या खोलीमध्ये बोलावून घेतले. अश्लिल चाळे करून तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करून तिचा विनयभंग केला. फिर्यादीवरून वडिलांवर भारतीय न्याय संहिता कलम ७४, ३५१ (३) सह बालकांचे लैंगिक अत्याचार संरक्षण अधिनियम कलम ८, १२ प्रमाणे पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.